# मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

**सुचना क्र.:- का.अ. (शहर)/ मुं.झो.सु.मंडळ/सु.बे.अ. सोडत क्र. १/२०२५-२६**

## सुचना

सुशिक्षित बेराजगार अभियंता यांना सोडत पद्धतीने मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील कामे वितरण करण्यासाठी दि. १०.०६.२०२५ रोजी सोडत कार्यकारी अभियंता (शहर) खोली क्र.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पु), मुंबई-४०० ०५१ येथे आयोजित केलेली असून सदर सोडतीचे सविस्तर सूचना म्हाडाच्या http://mhada.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. ०३.०६.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर सोडतीमध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी सोडतीच्या कार्यक्रमात नमुद अटी व शर्तीनुसार कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच छायांकित प्रती अधिकाऱ्यांच्या पडताळणीकरीता उपलब्ध कराव्यात.

सोबत : सोडतीचा कार्यक्रमाची सविस्तर माहिती.

**कार्यकारी अभियंता (शहर)**
**मु.झो.सु.मंडळ**

# सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | विवरण / तपशील |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिद्धी दिनांक | दि. ०३.०६.२०२५ |
| २ | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांचे सोडतीसाठी अर्ज स्विकारण्याची दिनांक व वेळ | दि. ०३.०६.२०२५ ते दि. ०९.०६.२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वा. |
| ३ | सोडतीसाठी अर्ज स्विकारण्याचे ठिकाण | कार्यकारी अभियंता (शहर) खोली क्र.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पु), मुंबई-४०० ०५१ |
| ४ | अर्ज व कागदपत्रे यांची तांत्रिक तपासणी दिनांक व वेळ | दि. १०.०६.२०२५ रोजी दुपारी १.०० ते ४.०० वा. |
| ५ | सोडतीसाठी पात्र सुशिक्षित बेराजगार स्थापत्य अभियंता यांची यादी जाहीर करणे दिनांक व वेळ | दि. १०.०६.२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. |
| ६ | प्रत्यक्ष सोडत दिनांक व वेळ | दि. १०.०६.२०२५ रोजी संध्याकाळी ४.१५ वाजता |
| ७ | सोडतीचे ठिकाण | कार्यकारी अभियंता (शहर) खोली क्र.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पु), मुंबई-४०० ०५१ |
| ८ | सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदाराची कामासह यादी जाहीर करणे दिनांक व वेळ ठिकाण | दि. १०.०६.२०२५ रोजी संध्याकाळी ५.३० वा. |

**अटी व शर्ती :-**

१) सदर सोडतीसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील सदस्य असलेले सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता हे भाग घेऊ शकतील.

२) अर्जासोबत खालील नमुद कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत छाया प्रती जोडणे आवश्यक आहे.

अ) पॅनकार्डची छायांकित प्रत

ब) पंजीकरण (नोंदणी) प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

क) जी.एस.टी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

ड) वर्क कार्ड ची छायांकित प्रत.

ई) मागील ३ वर्षाचे आयकर विवरण पत्र (ITR) किंवा पंजीकरण दिनांकापासूनचे उपलब्ध आयकर विवरण पत्राची (ITR) छायांकित पत्र.

३) कागदपत्रांच्या तांत्रिक तपासणी वेळी उपरोल्लोखीत कागदपत्रांच्या मुळ प्रती अर्जदाराने प्रत्यक्ष स्वत: उपस्थित राहून संबंधीत अधिकारी यांना पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

४) पंजीकरण प्रमाणपत्रावर नमूद केलेल्या पत्त्याच्या शासकीय पूराव्याची छायांकित प्रत. (रेशन कार्ड वगळून)

५) कामाच्या प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्यास प्राप्त अर्जामधून सोडत काढण्यात येईल.

६) कोणतेही कारण न देता कोणताही अर्ज स्विकारणे वा नाकारणे वा सोडत रद्द करणे चा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर )/मुं.झो.सु.मंडळ यांनी राखून ठेवले आहे.

७) सोडतीत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास अथवा कुठलाही आक्षेप आल्यास कार्यकारी अभियंता (शहर) / मुं.झो.सु. मंडळ यांचा निर्णय अंतिम राहील

**कार्यकारी अभियंता** (शहर)
**मु.झो.सु.मंडळ**